# कार्यालय प्रशासन

# OFFICE ADMINISTRATION

डॉ.मुक्ता गोविंदराव सोमवंशी-गंगणे



Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# कार्यालय प्रशासन

डॉ. मुक्ता गोविंदराव सोमवंशी (गंगणे)

| | |
|---|---|
| प्रकाशक<br>चिन्मय प्रकाशन,<br>सवणेकर बिल्डिंग, जिजामाता कॉलनी,<br>पैठणगेट, औरंगाबाद. मो. ९८२२८७५२१९<br>Email : chinmayprakashan@gmail.com<br>अक्षरजुळवणी<br>ज्ञानेश्वर के. सुस्ते<br>वेदिका टाईपसेटर्स, औरंगाबाद | © लेखकाधिन<br>दि. २३/६/२०१७<br>मुद्रक<br>सोहम प्रिंटर्स<br>औरंगाबाद.<br>मुखपृष्ठ : अपूर्वा ग्राफिक्स<br>औरंगाबाद.<br>किंमत : २३०/- |

ISBN : 978 - 93 - 81948 - 22 - 4

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

## प्रस्तावना

आधुनिककाळात सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवन यांची एक गुंफन झाली आहे. शासन व्यवस्थेची जबाबदारी वाढत आहे. सामाजिक परिवर्तन, सामाजिक व आर्थिक विकास, त्याचे न्याय वाटप, सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला अर्थपूर्ण बनविणे. अशा अनेक जबाबदाऱ्या शासनावर आलेल्या आहेत. त्यामुळे भारताच्या संदर्भात लोकप्रशासन शास्त्र हे यंत्रणा म्हणून विकसित होत आहे. परिणामी लोकप्रशासन शास्त्रात नवीन अभ्यास शाखांचा उदय होत आहे. लोकप्रशासन या शब्दांचा उच्चार केल्याबरोबर आपल्या डोळ्यासमोर सार्वजनिक कार्यांचे व्यवस्थापन करणाऱ्या व्यक्ती, संस्था उभ्या राहतात. लोकप्रशासनाची मूळ व्याप्ती मर्यादित होती. आधुनिक काळात ``प्रशासकीय राज्य`` संकल्पनेचा उदय होवून व्यक्तीच्या जन्मापूर्वीपासून ते मृत्यूनंतरही म्हणजेच ती अमर्यादित झाली आहे. लोकप्रशासन शास्त्रामुळेच कोणत्याही राष्ट्र व समाजाच्या पुनर्रचनेस व विकासाला गती प्राप्त होते. आणि देशातील नागरिकाचे जीवन सुखकर बनते. १९५० मध्ये एम. पी. शर्मा यांनी भारतात सर्वप्रथम नागपूर विद्यापीठात ``लोकप्रशासन व स्वशासन`` हा पदव्युत्तर विभाग स्थापन केला. १९५४ मध्ये पॉल ॲपलबीच्या (१९५३) अहवालानुसार भारतीय लोकप्रशासन संस्था (IIPA) स्थापन केली. या संस्थेच्या इंडियन जर्नल ऑफ पब्लिक ॲडमिस्ट्रेशन या संशोधन पत्रिकेद्वारे प्रशासकीय कार्यांचे ज्ञान पसरविले जाते. परिस्थितीअनुरूप लोकप्रशासनाच्या प्रत्यक्षकृतीतून प्रासंगिकता, सामाजिक समता, मूल्यसापेक्षता व परिवर्तनशीलता हे बदल झाले. परिणाम स्वरूप लोकप्रशासन संवेदशील, उत्तरदायी, गतिशील, विवेकी, निर्णयक्षम, कार्यकुशल व संयमी बनत गेले. यामुळे सामाजिक शास्त्रातील लोकप्रशासन शास्त्रात होणारे संशोधन चिंतन, अध्ययन, अध्यापन व्यक्तीला समाज, राष्ट्र व शासनाला दैनंदिन जीवनात उपयुक्त व मार्गदर्शक ठरते. याच प्रेरणेतून प्रा. डॉ. मुक्ता सोमवंशी (गंगणे) लिखित ``कार्यालयीन प्रशासन`` हा मौलिक ग्रंथ तयार केला आहे.

सुस्वभावी सामाजिक भान असलेल्या धाडसी, विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका म्हणून कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ येथे कार्यरत असलेल्या प्रा. डॉ. मुक्ता